**Prabhodhan Shikshan Prasarak Sanshta's Indira Institute of Pharmacy, Sadavali**
Academic Year [ 2022-23 ]

# Blood donation camp and HIV AIDS screening camp



**Date:** 16th August, 2022

**Event Schedule:**

| Date | Time | Description |
|---|---|---|
| 16 Aug 2022 | 10:00 AM - 02:00 PM | |

Dear All,

प्रबोधन शिक्षण प्रसारक संस्था संचलित इंदिरा इन्स्टिटयूट ऑफ फार्मसी येथे संस्थाध्यक्ष व माजी राज्य मंत्री श्री. रवींद्रजी माने यांचा ६४ वा वाढदिवस आणि महाविद्यालयाच्या 14 व्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. दि. १६ ऑगस्ट रोजी महाविद्यालयात रक्तदान शिबीर तसेच मोफत HIV तपासणी शिबीर आयोजित केले गेले. रक्तदान शिबीर वालावलकर रुग्णालय, डेरवण आणि राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आले. शिबिरामध्ये एकूण २५ NSS स्वयंसेवकांनी सहभाग नोंदवला. सदर रक्तदान शिबिरात महाविद्यालयातील कर्मचारी, विद्यार्थी आणि एडलर मेडीइक्विप मधील श्री. आशिष प्रभुदेसाई आणि कर्मचारी तसेच राजू काकडे हेल्प अ‍ॅकॅडमी मधील युवकांनी उस्फुर्त सहभाग नोंदवला.

महाविद्यालयाच्या उन्नत भारत अभियान आणि ICTC विभाग, ग्रामीण रुग्णालय, देवरुख यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत HIV तपासणी व रक्तशर्करा तपासणी करण्यात आली. ICTC विभागाच्या सौ. वैशाली पुजारी आणि सौ. विद्या माने यांनी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची तपासणी करत HIV एड्स विषयी समुपदेशन केले.

कार्यक्रमांच्या उदघाटन प्रसंगी श्री. रविंद्रजी माने, कार्यध्यक्षा सौ. नेहाजी माने, प्राचार्य डॉ. अमोल खाडे, संस्थेचे पदाधिकारी श्री. दिलीप जाधव, श्री. प्रभाकर सुपेकर, सरपंच श्री. राजुशेठ जाधव, सामाजिक कार्यकर्ते श्री. युयुत्सु आर्ते, श्री. बळवंत नलावडे आणि इतर मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रा. सुजित नगरे, प्रा. तन्मय पटवर्धन, प्रा. केतकी धने, प्रा. वैष्णवी नलावडे आणि महाविद्यालयातील कर्मचारी यांनी विशेष मेहनत घेतली.







